**जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा**
**(गृह शाखा)**
**महात्मा गांधी पुतळयाजवळ सिव्हील लाईन, वर्धा - 442001**

दूरध्वनी क्रमांक- (07152) 243446/240872 वेबसाईट- www.wardha.nic.in
फॅक्स क्रमांक - (07152) 240533 ई-मेल - wardhardc@gmail.com

क्र.कक्ष-2ब/अका/गृह/कावि- 186/21 दिनांक :- 15/02/2021.

**वाचा:-**

1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 चे कलम 2, 3, व 4.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुबंई यांचे पत्र क्र.कोरोना 2020/प्र.क्र./58/आरोग्य दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897.
4. मा. मुख्य सचिव, महसुल व वन आपत्ती व्यवस्थापन,मुदत व पुनर्वसन विभाग यांचे अधिसुचना क्र. DMU/2020/CR92/Dism-1 दिनांक 27-11-2020.
5. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचे अधिसुचना क्र. DMU/2020/CR92/Dism-1 दिनांक 29 जानेवारी,2021.
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष-2ब/अका/गृह/कावी 1121/2020, दिनांक 29-11-2020.
7. या कार्यालयाचे आदेश क्र.कलि/जिआव्यअ/कावी 643(अ)/20 दिनांक 9 एप्रिल,2020
8. या कार्यालयाचे आदेश क्र.जिआव्य/कोरोना विषाणू/कावी 769/20 दिनांक 18 एप्रिल,2020
9. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1)(2)(3)

---

**आदेश –**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग, मंत्रालय, मुबंई दिनांक 13, मार्च 2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-19) उदभवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे, व या विषाणुमुळे उद्दभ्वलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड, 2,3 व 4 ची अमंलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने वर्धा जिल्हयामध्ये तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे आपतकालीन योजना करणे गरजेचे असल्यामुळे जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचे संदर्भीय आदेश क्र.4 अन्वये दिनांक 29-01-2021 नुसार निर्बधामध्ये सुलभता व टप्पेनिहाय लॉकडाऊन उघडण्याबाबत प्राप्त सुचनेप्रमाणे या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष-2ब/अका/गृह/कावी 1121/2020, दिनांक 29-11-2020 वर्धा जिल्हयाकरीता आदेश पारीत करण्यात आले आहे.

**ज्याअर्थी,** दिनांक 1 फेब्रुवारी,2021 ते दिनांक 15 फेब्रुवारी,2021 या कालावधीत वर्धा जिल्हयातील हिंगणघाट व वर्धा तालुक्यात व जिल्हयात कोरोणा बाधीतांची संख्या वाढीत आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, जिल्हयातील शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये कोविड – 19 या विषाणुमूळे बाधित रुग्णांच्या संख्येमध्ये सातत्याने मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे प्रतिबंधक उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे.

**त्याअर्थी, मी, प्रेरणा देशभ्रतार, भा.प्र.से. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, वर्धा** आपत्ती व्यवस्थापन अधिनीयम-2005, साथ रोग नियंत्रण अधिनीयम-1897, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचे दिनांक 29-01-2021 व फौजदारी प्रक्रीया दंड संहिता 1973 चे कलम 144 (1)(2)(3) मधील तरतुदीनुसार कोवीड-19 चा प्रादुर्भाव व फैलाव होवु नये या करीता सामाजीक अंतर व इतर आवश्यक-

-उपाययोजनेचा अवलंब करुन वर्धा जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

1. वर्धा शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता जमावबंदीचे आदेश पारीत करण्यात येत असुन त्यानुसार शहरी व ग्रामीण भागामध्ये पाच किवा त्यापेक्षा जास्त लोकांनी जमावाने एकत्र जमू नये.
2. सर्व प्रकारच्या वेळोवेळी आयोजीत करण्यात येणाऱ्या धार्मिक स्वरुपाच्या यात्रा, उत्सव, समारंभ, महोत्सव, स्नेहसंमेलने, सामुहिक कार्यक्रम, सभा बैठका, लग्नसमारंभ इत्यादी करीता केवळ 50 व्यक्तींना उपस्थित राहता येईल. **परंतु अशा प्रकारच्या कोणत्याही कार्यक्रमाकरिता संबधीत कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनची परवानगी घेणे बंधनकारक राहील.** तसेच मिरवणुक व रॅली काढण्यास पुढील आदेशापर्यत प्रतिबंध करण्यात येत आहे. याबाबत स्थानिक प्रशासन व पोलीस विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.
3. मुद्दा क्रमांक 2 मधील नमुद कार्यक्रम ज्या मंगलकार्यालये, हॉटेल्स, कॉन्फरन्स रुम व तत्सम स्थळे या नियमांचा भंग केल्याचे आढळल्यास ही ठिकाणे सील करण्यात येतील.
4. लग्नसमारंभाच्या नियोजीत स्थळाव्यतिरीक्त इतर ठिकाणी गर्दी होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.
5. हॉटेल / पानटपरी / चहाची टपरी / चौपाटी इत्यादी सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर व सोशल डिस्टंसिंगचे नियम पाळणे, तसेच निर्जंतुकीकरण करणे बंधनकारक राहील. सदर ठिकाणी नागरिकांची गर्दी होत असल्याचे आढळुन आल्यास स्थानिक प्रशासन यांनी नियंत्रण ठेवण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. त्याच प्रमाणे नियमांचे उल्लंघन केले असल्याचे आढळुन आल्यास संबंधीत व्यवसायीक / दुकानदार यांचेवर कारवाई करण्यात यावी.
6. वर्धा जिल्हयातील सर्व धार्मीक संस्था / प्रार्थना स्थळे / यांनी त्यांचे संस्थान / मस्जीद / मंदीर / चर्च व इतर धार्मिक संस्थानामध्ये / कार्यक्रमामंध्ये गर्दी होणार नाही या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच सोशल डिस्टंसिंग व मास्कचा वापर करणे तसेच निर्जंतुकीकरण करणे बंधनकारक राहील. सदर नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळुन आल्यास त्यांचे विरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
7. वर्धा जिल्हयातील सर्व बाजारपेठांमध्ये नागरीकांची गर्दी होणार नाही या बाबत उ.वि.अ. तथा इंन्सिडंट कमांडंट यांनी दक्षता घेवुन व आवश्यक पथकाचे गठण करुन प्रतिबंधात्मक उपाययोजना त्यांचे स्तरावरुन करुन गर्दीस प्रतिबंध करण्यात यावा. तसेच सर्व बाजारपेठा या सायंकाळी 07.00 वाजेपर्यंत चालु राहतील व हॉटेल्स रात्री 09.00 वाजेपर्यंत चालु राहतील.
8. वर्धा जिल्हयामधील दिनांक 15-02-2021 पासुन सुरु करण्यात येणारी महाविद्यालये,विद्यार्थ्याकरिता दिनांक 28 फेब्रुवारी पर्यंत बंद ठेवण्यात येत आहेत. यापुर्वीच सुरु असणाऱ्या इतर शैक्षणीक संस्था, महाविद्यालये पुर्वी प्रमाणेच सुरु राहतील.
9. या कालावधीत ऑनलाईन / दुरस्थ शिक्षण यांना परवानगी राहील व त्याला अधिक वाव देण्यात यावा.
10. खाजगी आस्थापना / दुकाने या ठिकाणी मास्क घालुन / फेस कव्हर असलेल्या व्यक्तीनाच प्रवेश देण्यात यावा. तसेच हॉटेलच्या आतमध्ये सुध्दा मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील. या बाबत दर्शनि भागात बॅनर / फलक लावणे बंधनकारक राहील. नियमांचे उल्लंघन केले असल्याचे आढळुन आल्यास स्थानिक प्रशासनाने दंडात्मक कार्यवाही करावी.
11. हॉटेलमध्ये तसेच बाहेरील आवारात पार्किंगसाठी गर्दी होणार नाही या बाबत योग्य व्यवस्थापन सुनिश्चित करण्यात यावे. रांगा व्यवस्थापित करण्यासाठी व सामाजिक अंतर सुनिश्चित करण्यासाठी विशिष्ठ खुणा करण्यात याव्यात. तसेच दर्शनि भागात फलक लावण्यात यावा.
12. अतिथी / ग्राहकांनी वापरलेले फेस कव्हर्स / मास्क / हातमोजे यांची संबंधीतांनी योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात यावी.

13. संदर्भीय क्र. 7 व 8 नुसार - अ) सार्वजनिकस्थळी (रस्ते, बाजार, रुग्णालय,कार्यालय इ.) थुकणे दंड रुपये 500/-, ब) सार्वजनिक स्थळी चेहऱ्यावर मास्क न लावणे दंड रुपये 200/-, क) दुकानदार / फळभाजीपाला विक्रेते / सर्व जिवनावश्यक वस्तु विक्रेते इ. आणि ग्राहक यांनी सोशल डिस्टंसिंग न राखणे, ग्राहकामध्ये कमीत कमी 3 फुट अंतर न राखणे, विक्रेत्यांने मार्कींग न करणे दंड रुपये ग्राहक व्यक्ती करीता रुपये 200/- अशा प्रकारची दंडात्मक कारवाई करणेकामी वर्धा जिल्हयातील महसुल विभाग, पोलीस विभाग, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, नगर पालीका विभाग तसेच सहकार विभागा यांना देण्यात आले आहे. तरी कारवाई करुन संबधीत तहसिलदार तथा इंन्सिडंट कमांडंट यांना अहवाल सादर करण्यात यावा.
14. सार्वजनिक ठिकाणी वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्याचे काम नगर परिषद / नगर पंचायत व गट विकास अधिकारी यांच्याकडे राहील.
15. तालुका आरोग्य अधिकारी यांनी गृहविलगीकरणात असलेल्या व्यक्तींवर आशावर्कर, अंगणवाडी सेविका यांचे मार्फत निगराणी ठेवावी व दैनंदिन अहवाल उपविभागीय अधिकारी तथा इंन्सिडंट कमांडंट यांच्याकडे सादर करण्यात यावा.
16. यापूर्वी कोविड -19 चा प्रादुर्भाव फैलाव होवु नये या करीता वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेशांचे उल्लंघन होणार नाही या बाबत दक्षता घेण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे नमुद करण्यात आलेल्या बाबी हया नगपरिषद / नगरपंचायत क्षेत्रात मुख्याधिकारी व इतर क्षेत्रामध्ये उपविभागीय दंडाधिकारी / तालुका दंडाधिकारी यांनी तपासणी करावी. त्याच प्रमाणे संबंधीत क्षेत्रातील पोलीस विभागाने वेळोवेळी आवश्यक तपासणी करुन नियमानुसार कार्यवाही करावी.

उक्त आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता 1860 च्या कलम 188 अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 51 ते 60 नुसार शिक्षेसपात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबधीतावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल.

उक्त आदेश हा दिनांक 15/02/2021 च्या मध्यरात्री पासुन दिनांक 28-02-2021 पर्यंत संपुर्ण वर्धा जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागु राहील.

सदरहु आदेश आज दिनांक 15/02/2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

**( प्रेरणा देशभ्रतार,भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**

**प्रत — माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस.**

1. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर.यांना सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, वर्धा.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा.
4. उपविभागीय अधिकारी, वर्धा / आर्वी / हिंगणघाट.
5. जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा.
6. तहसिलदार, वर्धा / देवळी / सेलु / आर्वी / आष्टी / कारंजा / हिंगणघाट / समुद्रपूर.
7. मुख्याधिकारी,नगर परिषद, वर्धा / पुलगांव / देवळी / सिंदी / आर्वी / हिंगणघाट नगर पंचायत, कारंजा / आष्टी / सेलु / समुद्रपूर.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**